**पॉटी टॉक्स**

(जानेवारी २०१८)

अलीकडे भारतात गेलो होतो तेव्हाची गोष्ट. पुण्याबाहेरच्या एका रिसॉर्टमध्ये आमच्या सगळ्या परिवाराचं दोन दिवसांचं गेटटुगेदर होतं. त्यातल्या एका दिवशी सकाळी उठून शेजारच्या छोट्याशा गावात फिरायला बाहेर पडलो होतो. (इथे वातावरणनिर्मिती सुरु!) सात साडेसातची वेळ. हवेत सुखद थंडी होती. सूर्यनारायण आपल्या कोवळ्या किरणांनी वसुंधरेला गुदगुल्या करत होते. पक्ष्यांचा मंजुळ किलबिलाट सुरु होता. गाव हळूहळू जागं होत होतं. दुकानदार दुकानं उघडून रस्त्यावर पाणी मारत होते. रस्त्याकडेच्या चहाच्या टपऱ्या बोलायला लागल्या होत्या. मध्येच रस्त्यातून म्हशी रमतगमत चालल्या होत्या. त्यांच्या गळ्यातील घंटांचा मधुर नाद कानाला सुखावत होता. चिमुकली मुलंमुली घोळक्यानं दंगामस्ती करत शाळेत जात होती (आता वातावरणनिर्मिती बंद!) माझ्या बरोबर माझी ३ वर्षांची मुलगी चालली होती. ती भारतात याआधी आली होती तेव्हा अगदीच लहान होती, त्यानंतर आत्ताच आलेली. तिच्या अमेरिकेतल्या जीवनात तिला इतकी व्हरायटी एकाच दृश्यात बघायला मिळत नाही, त्यामुळं तिला विविधतेनं नटलेल्या भारताबद्दल किती माहिती देऊ आणि किती नको असं मला झालं होतं. ती माझं बोलणं कितपत ऐकत होती मला ठाऊक नव्हतं, पण मी बोलतच होतो. मध्येच मी तिला आपल्याला शहरी आणि ग्रामीण जीवनाची माहिती असणं कसं महत्वाचं आहे, आपल्याला जगात सगळीकडं कसं ॲडजस्ट होता आलं पाहिजे वगैरे वगैरे उपदेशाचे डोसही पाजत होतो.

चालता चालता ती मध्येच थांबली आणि तिनं विचारलं, “ बाबा, कॅन आय आस्क यू समथिंग?”

मुलीनं स्वत:हून प्रश्न विचारून ज्ञान प्रदान करण्याची एक आयती संधी बहाल केल्यामुळं मी गहिवरलो, आणि तिला म्हणालो,” विचार बाळा, काहीही विचार!”

रस्त्यावर पडलेल्या शेणाकडं बोट दाखवत तिनं विचारलं, “ बाबा, इथं रस्त्यात इतकी सारी पूप कुणी केली?”

मी कपाळाला हात लावला!

पॉटी ट्रेनिंग झाल्यापासून आणि डे केअर मध्ये वरच्या वर्गात गेल्यापासून पॉटी आणि संबंधित गोष्टी हा तिच्यासाठी बोलायचा अतिशय आवडीचा विषय झालाय. कुठल्याही नॉर्मल संभाषणात मध्येच पूप, शुशू वगैरे मंडळी शिरतात. मग कुठं खाद्यपदार्थांच्या नावाचे अपभ्रंश करून त्यांना पॉटीशी संबंधित नावं दे, प्रत्येक शब्दाच्या शेवटी उगाचच पॉटीशी संबंधित शब्द जोड वगैरे प्रकार चालू असतात. माझ्या बायकोनं तर ‘हे असलं सगळं तूच तिला शिकवत असशील’ असं म्हणून याचं खापर माझ्यावर कधीच फोडलंय, पण ही प्रतिभा माझी नाही. मी तिला प्रोत्साहनही देत नाही. हां आता एकदा आमच्या ओळखीचे एक अत्यंत खडूस आणि अजिबात विनोदबुद्धी नसलेले गृहस्थ घरी आले होते, तेव्हा त्यांना एक थोडासा लगदा झालेलं लॉलीपॉप देऊन तिनं ‘काका, टेक धिस लॉलीपूप इन युवर हॅन्ड’ असं म्हटलं होतं. त्यांचा चेहरा बघण्यासारखा झाला होता आणि त्यादिवशी त्यांनी घरातून लवकर काढता पाय घेतला होता. तेव्हा मी तिला हळूच शाबासकी दिली होती हे मान्य करतो!

निव्वळ पॉटीबद्दल बोलायलाच तिला आवडतं असं नाही तर पॉटी करायला जाणं हाही तिच्या आनंदाचा भाग असतो. तिथं एकदा बसलं की तिच्या गप्पांना अगदी ऊत येतो. एरवी ‘आज शाळेत कायकाय झालं?’ असं विचारलं की एकदोन वाक्यात उत्तर गुंडाळून टाकते, पण तिथं बसलं की सगळ्या घडामोडी अगदी तपशीलवार वर्णन करून सांगायच्या असतात. फक्त तिथंच बसून म्हणायची अशी तिची वेगळी गाणी आहेत, खेळायचे वेगळे खेळ आहेत. शिवाय आजूबाजूच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीचं- बेसिन, टिशूचा रोल, बकेट, मग, नॅपकीन वगैरे- व्यवस्थित निरीक्षण आणि त्यावर टिप्पणी झालीच पाहिजे असा दंडक आहे. बरं, ‘तुझं झालं की आम्हाला बोलव’ असं म्हणून

निघून गेलेलंही चालत नाही- हाका मारमारून आम्हाला परत बोलावून घेते. आम्ही आपले आळीपाळीनं डाव्या उजव्या पायावर भार टाकत तिथं उभे असतो, आणि कमालीच्या संथपणे तिचा सगळा कार्यक्रम सुरु असतो. सगळं एकदा मनासारखं झालं की मगच ती त्या गृहातून समाधानानं बाहेर पडते. तिची पॉटी हा आमचा एक कौटुंबिक कार्यक्रम बनून गेलाय!

पण लहान मुलांचं सोडा, मोठया माणसांचंही त्या जागेशी वेगळंच नातं असतं, नाही का? तिथं एखाद्या विषयावर जसं चिंतन-मनन होतं तसं कुठंच होत नाही. बहुदा शरीर आपसूक मुक्तीच्या मार्गाकडं जात असल्यामुळं मनही कल्पनेच्या, विचारांच्या भराऱ्या मारायला मोकळं होत असावं. मी पी एच. डी. करत असताना आमच्या गाइडचं ऑफिस आमच्या लॅबसमोरच होतं. तो रेस्टरूमकडं निघालेला दिसला की आमच्या काळजात धडकी भरायची. कारण तिथं गेल्यावर त्याचं विचारचक्र काय फिरायचं काय ठाऊक, पण परत येऊन तो आम्हाला एक्स्पेरिमेंटसच्या अशा काही भन्नाट आयडिया द्यायला लागायचा की आमच्या रिसर्चची सगळी दिशाच बदलून जायची.

माणूस कितीही सामर्थ्यशाली असू दे, पोटाचा मामला ठीक नसेल तर तोही हतबल होऊन जातो. आता अमेरिकेच्या सध्याच्या परमवंदनीय, नरश्रेष्ठ, कुशाग्रमति, नरपुंगव इ. इ. राष्ट्राध्यक्षांचं उदाहरण घ्या. त्यांच्या ट्विटर हॅबिट्स सगळ्यांच्या परिचयाच्या आहेतच. बरेचदा पहाटे किंवा सकाळी हे महाशय ट्विटरवर काहीतरी मुक्ताफळं उधळतात आणि मग सगळे 'त्यांनी असं का लिहिलं असेल? त्यांना डिप्लोमसी कळते का? ते राष्ट्राध्यक्ष व्हायला पात्र आहेत का?' याचा काथ्याकूट करत बसतात. मला सांगा, या गृहस्थाचं वय आहे ७१ वर्षे. यांच्या आवडीचा आहार काय, तर केएफसी आणि मॅक्डोनाल्ड्सचं जंक फूड आणि जोडीला डायट कोकचे कॅनवर कॅन. आता या वयात असं खाणं नसेल सोसत त्यांना, आणि असेल होत कधीकधी सकाळी त्रास. आणि त्याचा राग काढायला करत असतील ते अशी वेडीवाकडी ट्विट्स. त्याचा उगाच किती बाऊ करायचा? पण दररोज पॅनलिस्टना पकडून आणून चर्चाचं गुऱ्हाळ चालवणाऱ्या न्यूज मीडियानं या थिअरीचा विचार कधी विचार का नाही केला?

म्हणूनच मी कधी शत्रूलाही पोटाचा त्रास व्हावा अशी इच्छा व्यक्त करणार नाही. सुखाची व्याख्या काय हा तसा फार फिलॉसॉफिकल प्रश्न आहे. यावर मोठमोठ्या विचारवंतांनी अगदी सखोल विवेचन केलं आहे. पण मला वाटतं की याचं खरं उत्तर बरेचदा साध्या साध्या गोष्टींत दडलेलं असतं. कल्पना करा, रविवारची सकाळ आहे, शनिवारी रात्री आवडीचं भरपेट जेवण झालेलं आहे, सकाळी उशिरापर्यंत झोप झालेली आहे. उठून पोटात मस्तपैकी दोन कप चहा गेलेला आहे, काल रात्री बघितलेला आणि आवडलेला सिनेमा अजूनही डोक्यात रुंजी घालत आहे...अशावेळी प्रेशर यावं, बाथरूम सर्व सामुग्रीनं सुसज्ज असावं, बायकोचा भारतात माहेरी व्हिडीओ कॉल सुरु असल्यानं नजीकच्या काळात 'अरे किती वेळ आत जाऊन बसलायस?' असं म्हणून दारावर थाप यायची भीती नसावी… अहाहा! सुख, सुख म्हणतात ते अजून काय असतं?

यावेळच्या भारत दौऱ्यातलाच किस्सा आहे. दोन दिवस आमच्या कोल्हापूरच्या घरी गेलो होतो. कोल्हापूरला गेलो आणि मिसळ न खाता आलो असं कधी होत नाही. पण नेमकं ज्यादिवशी पोचलो त्याच दिवशी पोट बिघडलं. दुसऱ्या दिवशी रंकाळ्यावर फिरायला गेलो होतो. भेळेच्या, चाटच्या गाड्या, भाजलेली कणसं वगैरे जिभेला, नाकाला खुणवत होती. पण 'लगी आज सावन की फिर वो झडी है' अशी अवस्था झालेली असल्यानं कसाबसा संयम पाळला. तो दिवस मुगाची खिचडी, शहाळ्याचं पाणी, लिंबू सरबत अशा निरुपद्रवी पदार्थांवर काढला. उद्या सकाळी तर निघायचं होतं. यावेळी मिसळ राहून जाणार असं म्हणत चुकचुकत झोपी गेलो. पण दुसऱ्या दिवशी सकाळी निसर्गाची हाक आली, आणि शरीरानं चक्क 'ऑल वेल' असल्याचा संकेत दिला. माझी पचनसंस्था जणू मला 'बचेंगे तो और भी लढेंगे' असंच सांगत होती. मी तिला 'है शाब्बास!' म्हणालो, बाहेर येऊन चार मित्रांना गाठलं, तडक नेहमीच्या मिसळीच्या अड्ड्यावर गेलो, आणि तिथल्या बाकड्यावर बसून ऑर्डर दिली," मालक, मिसळ मारा बघू फस्क्लास!"

गौतम पंगू